सदैव तत्पर, सदैव मदतीस

Tel :- 022 22620453
E mail ID - dcpzone1-mum@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**पोलीस विभाग**
**Dy. Commissioner of Police, Zone 1, Mumbai**
Walchand Hirachand Marg, Fort, Mumbai-400001.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मुंबई.
वालचंद हिराचंद मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१

जा.क्र.७६७५/पोउआ/परि१/वा./२०२६ दिनांक -३१/०७/२०२६

प्रति,

पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई.

**विषय -** न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरुध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल....

**संदर्भ -** १) शासन निर्णय क्र. डीपीपी २०१५/प्र.क्र.५१/पोल१०, दि.२६/०२/२०१९

उपरोक्त विषयास अनुसरून अहवाल सादर करण्यात येतो की, दि. ०१/०४/२०२६ ते दिनांक ३०/०६/२०२६६ या कालावधीमध्ये पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ कार्यालयामध्ये न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरुध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीकरिता परिमंडळ -१ मधील सर्व पोलीस ठाण्यांचे पोलीस निरिक्षक (गुन्हे), पैरवी अधिकारी व विधी अधिकारी, परिमंडळ -१ इत्यादी सदस्य उपस्थित होते. समितीच्या बैठकींमध्ये परिमंडळ-१ मधील दोषमुक्त झालेल्या ०६ खटल्यांच्या न्यायनिर्णयांची तपासणी करण्यात आली.

सदरचा अहवाल माहितीकरिता सादर करण्यात येत आहे.

(मनीष कलवानिया) भा.पो.से
पोलीस उप-आयुक्त
दक्षिण परिमंडळ-१, मुंबई

Dy. Commissioner of Police (Detection)
Crime Branch C I D Mumbai

पोउआ (प्रकटीकरण)
आ. क्र.
दिनांक / / २०

**आयुक्तालय / पोलीस अधिक्षक कार्यालय :- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -१, मुंबई** **समितीच्या बैठकीचा दिनांक :- दिनांक - /०६/२०२६**

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरूध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेशन केस क्र. १३१५/२०२१<br><br>मा. न्यायाधीश<br>**श्रीमती. माधुरी देशपांडे** | **कुलाबा पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. २५२/२०२१, कलम ३६३, ३७६ भा.दं.वि सह ४ पोक्सो ॲक्ट | २०/१०/२०२१ | २७/०४/२०२६ | १. पिडीत मुलीच्या जन्मतारखेचा कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.<br>२. सदर पिडीत मुलीचा जन्म तारखेचा पुरावा मिळून आलेला नाही.<br>३. सदर मुलगी अल्पवयीन होती ती १८ वर्षापेक्षा कमी होती हे न्यायालयात सिध्द झाले नाही.<br>४. आरोपी विरूध्द कोणतीही तक्रार नसल्याबाबत पीडितीने कबूल केले आहे.<br>५. खटल्यातील प्रमुख साक्षीदार फितुर झाले.<br>६. पिडीत मुलगी आरोपी सोबत तिच्या मर्जीने गेली असलेबाबत कबुल केले आहे.<br>७. आरोपी बरोबर पिडीत मुलीने लग्न केलेले असून, त्यांना मुलगी असलेबाबत कबुल केलेले आहे.<br>एकंदरीत सदर गुन्हयामध्ये साक्षीदार फितूर झाल्याने आरोपी दोषमुक्त झाला आहे. | **नाही** | - | - |
| २ | सेशन केस क्र. १०४६५/२०२०<br><br>कोर्ट नं. १०<br>मा. न्यायाधीश<br>**श्री. कमल जयसिंगानी** | **कुलाबा पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ५०/२०१४, कलम ३५३, ४२७, ५०४ भादवी | २४/०७/२०१४ | ११/०५/२०२६ | १. सदर केसमध्ये आरोपीने बळाचा वापर पोलीसांवर केलेला असलेबाबत न्यायालयात पुरेसा पुरावा सादर करता आलेला नाही.<br>२. अभियोक्ता पक्षाकडून स्वतंत्र साक्षीदारांची तपासणी करण्यात आलेली नाही.<br>३. आरोपीच्या विरूध्द गुन्हा सिध्द करण्याकरिता न्यायालयात पुरावा सादर करण्यात आलेला नाही.<br>४. सदर केसमध्ये आरोपीने मालमत्तेचे नुकसान केले असलेबाबत कागदोपत्री पुरावा न्यायालयात सादर केलेला नाही.<br>एकंदरीत आरोपीवर विरूध्द सबळ पुरावा उपलब्ध न झाल्याने आरोपी दोषमुक्त झाला आहे. | **नाही** | - | - |

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | सेशन केस क्र.<br>५४०/२०२०<br><br>कोर्ट नं. ३३<br>न्यायाधीश<br>श्री. ए.एस. वैरागड | **कफ परेड पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ८२/२०२०<br>कलम<br>३७६(२)(एफ)(एम),३७७,३२३ भा.दं.वि. | ०५/०८/२०२० | २५/०६/२०२६ | १. सदर केसमध्ये फिर्यादी ही आरोपीची कायदेशीर पत्नी असल्याने कलम ३७५ (२) भादवि अन्वये पतीने पत्नीसोबत केलेले लैंगिक संबंध हे बलात्कार मानले जावू शकत नाहीत.<br>२. सदर केसमध्ये आरोपी विरुध्द शिक्षा होण्याकरिता कोणतेही पुरावे न्यायालयात सादर करता आलेले नाहीत.<br>३. फिर्यादीची प्रथम खबरी अहवालावर स्वाक्षरी नाही.<br>४. सदर केसमध्ये प्रत्यक्ष साक्षीदार नाहीत.<br>५. आरोपीविरुध्द लैंगिक अत्याचार केलेले पुरावे न्यायालयात सादर केलेले नाहीत.<br>**एकंदरीत सदर केसमधील आरोपी विरुध्द पुरावा सिध्द न झाल्याने, आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | **नाही** | **नाही.** | - |
| ४ | सेशन केस क्र.<br>४२८/२०२३<br><br>मा. न्यायाधीश<br>**श्रीमती सुरेखा सिन्हा** | **कफ परेड पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. २०/२०२३,<br>कलम ३७६ भा.दं.वि. सह ४,८,१२ पोक्सो ॲक्ट | २०/०४/२०२१ | ०१/०६/२०२६ | १. पिडीत मुलीच्या पालकांचा पुरावा रेकॉर्डवर सादर केलेला नाही.<br>२. सदर मुलगी अल्पवयीन होती ती १८ वर्षापेक्षा कमी होती हे न्यायालयात सिध्द झाले नाही.<br>३. आरोपी विरुध्द तक्रार नसलेबाबत पिडीत मुलीने कबुल केलेले आहे.<br>४. पिडीत मुलगी फितुर झाली.<br>५. पिडीत मुलीलीने सदर खटला चालवण्यामध्ये स्वारस्य नसल्याचे कबुल केले.<br>६. प्रथम खबरी अहवालमधील मजकुर फिर्यादी पक्ष सिध्द करू शकला नाही.<br>**एकंदरीत पिडीत मुलगी फितुर झाल्याने, आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | **नाही.** | **नाही.** | - |
| ५ | सेशन केस क्र.<br>४२५/२०२०<br><br>मा. न्यायाधीश<br>**श्री. उमेश सरोटे** | **आझाद मैदान पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १३८/२०१९,<br>कलम ३५३ भादवि | २८/०१/२०२० | २९/०४/२०२६ | १. सदर केसमध्ये आरोपीने बळाचा वापर केलेला असलेबाबत न्यायालयात पुरेसा पुरावा सादर करता आलेला नाही.<br>२. आरोपीने फिर्यादीवर हल्ला केलेबाबत सदर केसमधील साक्षीदारांनी न्यायालयात कबुल केले नाही.<br>३. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी आरोपीचा इतराना इजा न करण्याचा हेतू होता असे कबुल केलेले आहे.<br>४. साक्षीदारांच्या जबाबामध्ये विसंगती आढळून आल्या आहेत.<br>५. साक्षीदार क्र.१ यांनी ते कर्तव्यावर होते याबाबत तपासी अधिकारी यांचेकडे कोणतीही कागदपत्रे सादर केली नसलेबाबत कबुल केलेले आहे.<br>६. सदर खटल्यातील माहिती देणार साक्षीदार क्र.१ व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्या साक्षीमध्ये विरोधाभास | **होय.<br>पोउनि विक्रम सुरोद<br>आझाद मैदान पो. ठाणे** | **मा. अपोआ, द. प्रा.वि. यांना अहवाल सादर** | - |

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांचे नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | दिसून आला.<br>**एकंदरीत तपासी अधिकारी यांच्या तपासातील त्रुटीमुळे तसेच पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | | | |
| ६ | सेशन केस क्र. ५६१/२०११<br><br>कोर्ट नं. २५<br>न्यायाधीश<br>**श्री. चकोर बाविसकर** | **आझाद मैदान पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ३१७/२००६, कलम २५५, २५८ सह ३४ भा.दं.वि. सह ६३ बॉम्बे स्टॅप ॲक्ट | २७/०२/२०११ | १८/०६/२०२६ | १. तपासी अधिकारी यांनी न्यायालयात आरोपीनी टपालाची बनावटीकरण केले नसलेबाबत कबुल केलेले आहे.<br>२. सदर केसमधील साक्षीदार क्र.२७ यांनी हस्ताक्षच्या ओळखीबद्दल न्यायालयात निर्णायक मत दिलेले नाही.<br>३. तपासी अधिकारी यांन जप्त केलेल्या स्टॅम्प पेपरच्या खरेदीदारांचे हस्ताक्षर घेतले नसलेबाबत न्यायालयात कबुल केलेले आहे.<br>४. सदर केसमध्ये तपासी अधिकारी यांनी त्यांचेकडून न्यायलयात सबळ पुरावे सादर केलेले नसलेबाबत कबुल केलेले आहे.<br>५. न्यायालयात आरोप विरुध्द खटला चालविण्याकरिता परवानगी मिळविण्याकरिता कोणतेही प्रयत्न केलेले नसलेबाबत तपासी अधिकारी यांनी कबुल केलेले आहे.<br>६. बनावट मुद्रांकचा स्त्रोत कुठून आला याबाबत तपासी अधिकारी कोणत्याही निष्कर्षा पर्यंत गेले नसल्याचे सिध्द झाले.<br>**एकंदरीत सदर केसमध्ये तपासी अधिकारी यांनी योग्य तपास न केल्यामुळे व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | **होय.<br>पोनि सुनिल कांबळे<br>आझाद मैदान पो. ठाणे** | **मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर** | - |
| ७ | सेशन केस क्र. ३७३६/२०२५<br><br>कोर्ट नं. ३७<br>न्यायाधीश<br>**श्री. योगेश मनाठकर** | **डोंगरी पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १२६/२०१८, कलम ३५४(ड) भा.दं.वि. सह १२ पोक्सो ॲक्ट | ३०/०३/२०१९ | २८/०४/२०२६ | १. फिर्यादीने कलम १६४ अंतर्गत दिलेल्या जबाबात इंस्टाग्राम संदेशाचा कोणताही संदर्भ नाही.<br>२. इंस्टाग्राम मेसेज केल्याचे कोणतेही आरोप नाहीत.<br>३. फौ.प्र.सं. कलम १६४ अन्वये पिडीतेच्या नोंदविलेल्या जबाबामध्ये पिडीतीने अर्जदार यांने मेसेज पाठविलेबाबतच्या घटनेबाबत उल्लेख केलेला नाही.<br>४. फिर्यादीने कलम १६४ अंतर्गत दिलेल्या जबाबात अर्जदार तिच्या घरी गेला आणि त्याने तिला त्याच्यांसोबत फिरायला येण्यास सांगितले या कारणास्तव एफ.आर.आय. दाखल करण्यात आला. परंतु, सदर घटनेचा एफ.आर.आय. मध्ये कोणताही संदर्भ नाही.<br>**एकंदरीत साक्षीदार फितुर झाल्याने व सदर केसमध्ये पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | **नाही** | **नाही.** | - |

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | सेशन केस क्र. ७२५/२०२२<br><br>कोर्ट नं. ३७<br>न्यायाधीश<br>**श्री. योगेश मनाठकर** | **डोंगरी पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १४६/२०१६, कलम ३२८,१८८,२७३,३४ भा. दं.वि. सह ३०(२)(अ),२७(१)(२)(फ) अन्न सुरक्षा मानके कायदा | ३१/०८/२०१६ | ०३/०६/२०२६ | १. साक्षीदाराने साक्षीच्या वेळी आरोपीला न्यायालयात ओळखले नाही.<br>२. न्यायालयात जप्त करण्यात आलेला गुटखा, तंबाखू हा मनुष्य जीवीतास हानिकारक असलेबाबतचे रासायनिक प्रयोगशाळेचा अहवाल सादर करण्यात आलेला नाही.<br>३. आरोपीच्या ताब्यात असलेली गुटख्याची तीन दुकाने ही त्याच्या ताब्यात होती अथवा भाडेतत्वार होती असा कोणताही भाडेतत्वावरचा पुरावा किंवा ताबापत्र न्यायालयात सादर केलेले नाही.<br>४. अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम ४२ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींचे पालन झालेले नसल्याने, कलम ५९ अन्वये आरोपीला दोषी धरू शकत नाही.<br>५. सदर प्रकरणामध्ये खटला दाखल करण्याकरिता मा. आयुक्त, अन्न व सुरक्षा यांचेकडे पुर्व परवानगीची मागणी करण्यात आलेली नाही.<br>**एकंदरीत सदर केसमध्ये तपासी अधिकारी यांनी योग्य तपास न केल्यामुळे व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | होय.<br>पोउनि संभाजी वडते<br>डोंगरीपो. ठाणे | मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर | - |
| ९ | सेशन केस क्र. ७४४/२०२२<br><br>कोर्ट नं. ३७<br>न्यायाधीश<br>**श्री. योगेश मनाठकर** | **सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ३२०/२०२१, कलम ३२८,१८८,२७२,२७३ भा.दं.वि. सह २६(२)(आय)(आयव्ही), २७(३)(ई), सह ३(आय)(झेडझेड)(व्ही), ३०(२)(ए) अन्न सुरक्षा मानके कायदा | १२/०७/२०२२ | १९/०६/२०२६ | १. न्यायालयात जप्त करण्यात आलेला गुटखा, तंबाखू हा मनुष्य जीवीतास हानिकारक असलेबाबतचे रासायनिक प्रयोगशाळेचा अहवाल सादर करण्यात आलेला नाही.<br>२. आरोपीकडून ज्या रूममधून गुटखा ताब्यात घेतला तो रूम आरोपीने भाडेतत्वावर घेतला होता ते सिध्द करण्यासाठी पोलीसांनी आरोपीकडून भाडेचा करारनामा किंवा किंवा ताबापत्र न्यायालयात सादर केलेले नाही.<br>३. अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम ४२ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींचे पालन झालेले नाही.<br>४. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये poisonous of any stupefying intoxicating or unwhlesome drug अशा प्रकारचे घटक होते हे अभियोग पक्षाने पुराव्यानिशी न्यायालयात सादर केलेले नाही.<br>५. पंच साक्षीदारांची साक्ष आणि अभिसयोग पक्ष मांडत असलेल्या बाजु बद्दल तीव्र संशय निर्माण होतो असे न्यायालयाचे निर्दशनास आले.<br>**एकंदरीत सदर केसमध्ये तपासी अधिकारी यांनी योग्य तपास न केल्यामुळे व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | होय.<br>पोउनि दादाभाऊ सोनावणे<br>सर जे.जे. मार्ग पो. ठाणे | मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर | - |

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार अराल्यारा त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | सेशन केस क्र. २०२/२०२३<br><br>कोर्ट नं. ३७<br>न्यायाधीश<br>**श्री. योगेश मनाठकर** | **सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १२/२०२२<br>कलम<br>३२८,१८८,२७२,२७३<br>भा.दं.वि. सह<br>२६(२)(आय)(आयव्ही),<br>अन्न सुरक्षा मानके कायदा | ०३/०१/२०२३ | ०७/०५/२०२६ | १. न्यायालयात जप्त करण्यात आलेला गुटखा, तंबाखू हा मनुष्य जीवीतास हानिकारक असलेबाबतचे रासायनिक प्रयोगशाळेचा अहवाल सादर करण्यात आलेला नाही.<br>२. आरोपीकडून ज्या रुममधून गुटखा ताब्यात घेतला तो रुम आरोपीने भाडेतत्वावर घेतला होता ते सिध्द करण्यासाठी पोलीसांनी आरोपीकडून भाडेचा करारनामा किंवा किंवा ताबापत्र न्यायालयात सादर केलेले नाही.<br>३. अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम ४२ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींचे पालन झालेले नाही.<br>४. जप्त मुद्देमालाबाबत सीलबंद केलेल्या पाकीटांबाबत स्पष्ट पुरावा दाखल झालेला नाही.<br>५. साक्षीदारांच्या साक्षीबद्दल आणि पोलीसांनी छापा मारुन प्रतिबंधीत केलेला गुटखा असा परस्पर विरोधाभास पुरावा दिसून येत आहे.<br>६. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये poisonous of any stupefying intoxicating or unwhlesome drug अशा प्रकारचे घटक होते हे अभियोग पक्षाने पुराव्यानिशी न्यायालयात सादर केलेले नाही.<br>७. पंच साक्षीदारांची साक्ष आणि अभिसयोग पक्ष मांडत असलेल्या बाजु बद्दल तीव्र संशय निर्माण होतो असे न्यायालयाचे निर्दशनास आले.<br>**एकंदरीत सदर केसमध्ये तपासी अधिकारी यांनी योग्य तपास न केल्यामुळे व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | **होय.<br>पोउनि मोहसिन नदाफ<br>सर जे.जे. मार्ग पो. ठाणे** | मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर | - |
| ११ | सेशन केस क्र. २११/२०२३<br><br>कोर्ट नं. ३७<br>न्यायाधीश<br>**श्री. योगेश मनाठकर** | **सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ४९१/२०२२<br>कलम<br>३२८,१८८,२७२,२७३<br>भा.दं.वि. सह ५९ अन्न सुरक्षा मानके कायदा | ०५/०१/२०२३ | ०५/०५/२०२६ | १. आरोपीकडून ज्या दुकानातून प्रतिबंधीत गुटखा ताब्यात घेतला होता त्या तारखेला ते दुकान आरोपीच्या ताब्यात होते याबाबत पोलीसांनी भाडयाचा करारनामा किंवा ताबापत्र हस्तगत केलेले नाही.<br>२. अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम ४२ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींचे पालन झालेले नाही.<br>3- अन्न सुरक्षा अधिकारी food Analyst, Designated officer किंवा Commissioner of food यांचा गुन्हयाच्या तपासात कोणताही सहभाग नाही व खटला दाखल करण्यासाठी पुर्व परवानगी मागीतलेली नाही.<br>४. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये poisonous of any stupefying intoxicating or unwhlesome drug अशा प्रकारचे घटक होते हे अभियोग पक्षाने | **होय.<br>सपोनि अविनाश पोरे<br>सर जे.जे. मार्ग पो. ठाणे** | मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर | - |

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पुराव्यानिशी न्यायालयात सादर केलेले नाही.<br>एकंदरीत सदर केसमध्ये तपासी अधिकारी यांनी योग्य तपास न केल्यामुळे व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे. | | | |
| १२ | सेशन केस क्र. ४००/२०२३<br>कोर्ट नं. २३<br>न्यायाधीश<br>**श्री. एम.आर.ए.शेख** | **सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ७८/२०२२<br>कलम<br>३२८,१८८,२७२,२७३<br>भा.दं.वि. सह ३(i)(ii)(a), २६(२)(i)(ii)(iv),५९ अन्न सुरक्षा मानके कायदा | २१/०२/२०२३ | १४/०५/२०२६ | १. आरोपीविरुध्द साक्षीदारांनी आरोपी प्रतिबंधीत खादयपदार्थ विक्री व्यवसायात गुंतलेला होता हे कबुल केले नाही.<br>२. आरापीने कोणत्याही ग्राहकाला प्रतिबंधीत खादयपदार्थ विकल्याबाबत न्यायालयात पुरावा सादर केलेला नाही.<br>३. आरोपी विरुध्द कोणताही ग्राहक साक्ष देण्याकरिता न्यायालयात हजर राहीला नाही.<br>४. जप्त करण्यात आलेला खादयपदार्थ हा कलम ३२८ अन्वये अवैध खादयपदार्थ आहे असा कोणताही सबळ पुरावा न्यायालयात सादर केलेला नाही.<br>५. आरोपी भेसळयुक्त खादयपदार्थ बाळगत होता आणि त्याची विक्री करीत होता हे न्यायालया पुराव्यानिशी सिध्द करता आलेले नाही.<br>एकंदरीत सदर केसमध्ये तपासी अधिकारी यांनी योग्य तपास न केल्यामुळे व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे. | **होय.<br>सपोनि<br>अविनाश पोरे<br>सर जे.जे. मार्ग पो. ठाणे** | **मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर** | - |